**LAR No. 69-2018**
Gayabai Vs. State
CNR No. MHOS140002322018

## <u>अर्ज क्र. 23 व 27 वर संयुक्तीकरित्या आदेश पारीत</u>

१. प्रस्तुतचे प्रकरण भूसंपादन कायद्या अंतर्गत दाखल आहे. यातील अर्जदार क्रमांक १ दयाबाई या दिनांक २५.०६.२०२३ रोजी मयत झाल्या असून त्यांना निशाणी क्रमांक २७ मध्ये नमूद वारस आहेत. त्या वारसांना या प्रकरणात वारस म्हणून समाविष्ट करण्यासाठी विलंब झालेला आहे. तो माफ करण्यात यावा अशी विनंती वारसांनी निशाणी क्रमांक २३ मधील अर्जात केली आहे. विरुद्ध पक्षाने अर्ज नामंजूर करावा असा जबाब दिलेला आहे

२. दोन्ही पक्षांतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. वारसांना रेकॉर्डवर आणण्याचे कार्य हे तांत्रिक स्वरूपाचे आहे, त्याचा उद्देश मयत व्यक्ती तर्फे बाजू मांडण्यासाठी त्यांच्या वारसांना प्रकरणात समाविष्ट करणे हा आहे. असे न घडल्यास प्रकरण एकतर्फा निकाली लागेल व त्यामुळे अन्याय होण्याची शक्यता आहे. सदरचे प्रकरण भूसंपादन कायद्याअंतर्गत असल्यामुळे, हा कायदा सामाजिक हिताकरिता व त्याचा उद्देश ज्यांच्या जमिनी शासनाने संपादित केल्या आहेत, त्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य तो मोबदला मिळावा हा आहे. वारसाअभावी हे प्रकरण पुढे न्यायनिर्णीत झाले तर अवॉर्डच्या वेळेस वारसांना मावेजा मिळणार नाही; कारण ते रेकॉर्डवर आणले गेले नाहीत. या दृष्टिकोनातून विचार केला असता वारसांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे, जरी विलंबास संयुक्तिक कारण नसले तरी अर्ज नॉमिनल कॉस्ट वर मंजूर करण्यात येतो. करिता खालील प्रमाणे आदेश

# <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १ | निशाणी क्रमांक २३ वरील विलंब माफीचा अर्ज **रक्कम रुपये 500 कॉस्ट** वरती मंजूर करण्यात येतो. सदरची रक्कम विधी सेवा प्राधिकरण, परंडा येथे जमा करावी. |
| २ | **निशाणी क्रमांक २७** वरील वारसांना रेकॉर्डवर आणण्याचा अर्ज **मंजूर** करण्यात येतो. |
| ३ | वारसांना रेकॉर्डवर आणण्याच्या दुरुस्तीची प्रक्रिया व दुरुस्ती अर्ज पुढील तारखेपर्यंत संबंधितांनी सादर करावा. अन्यथा दुरुस्ती अर्ज नामंजूर असा समजावा. |

RAJU TUKARAM INGLE
Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2024.10.22 11:35:18 +0530

दिनांक –२१.१०.२०२४

**(आर. टी. इंगळे)**
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,परंडा.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 21-10-2024 |
| Order signed by the presiding officer on | - | 21-10-2024 |
| Order uploaded on | - | 22-10-2024 |